# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ बैठक

## कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 173 |
| स्थळ | : | Online Meeting App |
| वार व दिनांक | : | शुक्रवार दि. 7 ऑगस्ट 2020 |
| वेळ | : | दुपारी 3.00 वाजता |

25

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
## (महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची 173 वी ऑनलाईन बैठक शुक्रवार दिनांक 7 ऑगस्ट 2020 रोजी दुपारी 3.00 वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. मा.प्रा. ई. वायुनंदन, कुलगुरू | अध्यक्ष |
| 2. मा. डॉ. दिलीप म्हैसेकर, कुलगुरू, नाशिक | सदस्य |
| 3. मा.डॉ. आशिष पातुरकर, कुलगुरू, नागपूर | सदस्य |
| 4. मा.डॉ. अनिल कुलकर्णी, पुणे | सदस्य |
| 5. मा.श्री. ज्ञानदेव नाठे, संचालक, तंत्रशिक्षण यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| 6. मा, श्री. हेमंत आंबासेलकर, नागपूर | सदस्य |
| 7. मा, डॉ. सचिन मांडवगणे, नागपूर | सदस्य |
| 8. मा.श्री. विलास शिंदे, नाशिक | सदस्य |
| 9. मा. डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव | सदस्य सचिव |

खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | |
|---|---|
| 10. डॉ. सत्यकामा, प्रकुलगुरू, इंगांरामुवि, नवी दिल्ली | सदस्य |
| 11. प्रा. महेंद्र लामा, नवी दिल्ली | सदस्य |
| 12. मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, मुंबई | सदस्य |
| 13. मा. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 14. मा. सचिव, कृषी, मुंबई | सदस्य |
| 15. मा, संचालक, उच्च शिक्षण, पुणे | सदस्य |
| 16. मा, संचालक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण | सदस्य |

| क्र. | ठराव क्र. | तपशिल |
|---|---|---|
| 173.1.0 | | **स्वागत – Welcome by Registrar** |
| | 173.1.1 | बैठकीच्या सुरुवातीला कुलसचिवांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. मा. कुलगुरू यांनी मा.राज्यपाल नियुक्त नवनिर्वाचित सदस्य श्री. विलास शिंदे, नाशिक यांचा परिचय करून दिला व त्यांचे स्वागत केले. त्यानंतर कुलसचिव, डॉ. दिनेश भोंडे यांनी कोरोना प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत विद्यापीठाच्या विविध बैठका, परिसंवाद, कार्यक्रम, इ. ऑनलाईन घेण्याच्यादृष्टिने विद्यापीठ मुख्यालयात सुसज्ज व अद्ययावत अशी Video Conference Room तयार करण्यात आल्याची व ही बैठक तेथूनच आयोजित करण्यात येत असल्याबाबत माहिती दिली. |



कुलसचिव यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक-४२२ २२२

| | | |
|---|---|---|
| 173.2.0 | 173.2.1 | **दि. 17 डिसेंबर 2019 रोजी झालेल्या 171 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.**<br><br>***व्यवस्थापन मंडळ ठराव-*** *दि. 17 डिसेंबर 2019 रोजी झालेल्या 171 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कोणताही आक्षेप नसल्याने सर्वानुमते कायम करण्यात आला.* |
| | 173.2.2 | **दि. 16 एप्रिल 2020 रोजी झालेल्या 172 व्या व्यवस्थापन मंडळाच्या परिभ्रमणाद्वारे आयोजित बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.**<br><br>***व्यवस्थापन मंडळ ठराव-*** *दि. 16 एप्रिल 2020 रोजी झालेल्या 172 व्या व्यवस्थापन मंडळाच्या परिभ्रमणाद्वारे आयोजित बैठकीचे कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला.* |
| | 173.2.3 | **दि. 17 डिसेंबर 2019 रोजी झालेल्या 171 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीत झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल.**<br><br>याबाबत डॉ. अनिल कुलकर्णी व डॉ. आशिष पातूरकर यांनी ठराव क्र. 171.3.3 नुसार झालेल्या मेडिक्लेम योजनेबाबत विचारणा केली व केवळ New India Assurance सारख्या शासकीय कंपन्यांकडूनच ही योजना घ्यावी असे सुचविले. त्यावर फक्त शासकीय विमा कंपन्यांकडूनच दरपत्रके मागविण्यात आलेली असून त्यातही स्पर्धा व्हावी याउद्देशाने या सर्व शासकीय कंपन्यांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तसेच Oriental Insurance कंपनीचे दर विहित नमुन्यात नसल्याने त्यांचेकडून मागविण्यात आलेले आहेत. मात्र कोरोना प्रादुर्भावाने निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे अद्याप त्यांनी ते दिलेले नसल्याची माहिती मा.कुलगुरू यांनी दिली.<br><br>याबाबत पुढील कार्यवाही करणेबाबत खरेदी अधिकारी यांना निर्देशित केलेले असल्याचे कुलसचिवांनी सांगितले तसेच पुढे NPS योजनेबाबतच्या कार्यवाही बाबतही माहिती दिली. NPS योजनेबाबत HDFC कंपनीने Presentation केलेले असून SBI व इतर नामांकित कंपन्यांकडूनही Proposals व Quotations मागविण्यात येत आहेत. व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयानुसार या दोनही योजना वित्त समितीच्या पुढील बैठकीत अभ्यास करून शिफारसीसाठी सादर करण्यात येतील.<br><br>***व्यवस्थापन मंडळ ठराव-*** *दि.17 डिसेंबर 2019 रोजी झालेल्या 171 व्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीच्या अहवालाची नोंद घेण्यात आली.* |

| | | |
|---|---|---|
| | 173.2.4 | **दि. 16 एप्रिल 2020 रोजी झालेल्या 172 व्या व्यवस्थापन मंडळ परिभ्रमणाद्वारे आयोजित बैठकीत झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल.**<br><br>***व्यवस्थापन मंडळ ठराव-*** *दि. 16 एप्रिल 2020 रोजी झालेल्या 172 व्या व्यवस्थापन मंडळ परिभ्रमणाद्वारे आयोजित बैठकीत झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीच्या अहवालाची नोंद घेण्यात आली.* |
| 173.3.0 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 173.3.1 | **विद्यापीठात विशेष शिक्षणक्रमासाठी** Centre for Disability Studies **स्थापन करणेबाबत....**<br><br>सध्या Disability संबंधीचे शिक्षणक्रम शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत राबविण्यात येत आहेत. मात्र यासाठी स्वतंत्र केंद्र स्थापन करण्याच्या सूचना Rehabilitation Council of India, New Delhi (RCI) यांनी दिलेल्या असून त्याशिवाय निधी, मान्यता, इ. बाबी न देण्याबाबत कळविले असल्याची माहिती मा.कुलगुरू यांनी दिली. RCI कडून निधी मिळविणे, पदवी पातळीवरील शिक्षणक्रमांना मान्यता घेणे व ते राबविणे, यासाठी विद्यापीठात स्वतंत्र अभ्यास केंद्र सुरु करणे, इ. उद्दीष्टांसाठी हे केंद्र स्थापन करावयाचे असल्याचे मा.कुलगुरूंनी पुढे सांगितले.<br><br>***व्यवस्थापन मंडळ ठराव-*** *या शिक्षणक्रमांचे सामाजिक हित लक्षात घेता हे शिक्षणक्रम चालविणे आवश्यक असून त्यासाठी विद्यापीठात स्वतंत्र केंद्र स्थापन करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.* |
| | 173.3.2 | **दि, 14 जुलै 2020 रोजी झालेल्या खाते अंतर्गत पदोन्नती बैठकीचे इतिवृत्त मान्यतेसाठी**<br><br>दिनांक 14 जुलै 2020 रोजी झालेल्या खाते अंतर्गत पदोन्नती समिती बैठकीच्या शिफारसी व्यवस्थापन मंडळापुढे सादर करण्यात आल्या व त्यावर खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला.<br><br>***व्यवस्थापन मंडळ ठराव-*** *श्री. निखील ताम्हणकर, सहा. कुलसचिव यांना उप कुलसचिव पदावर तर श्रीमती वंदना झेंडे, कक्ष अधिकारी यांना सहा.कुलसचिव या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच श्री. टि.के. सोनवणे, सहा. कुलसचिव यांचा परिविक्षा कालावधी दिनांक 30/9/2017 रोजी संपुष्टात आणून त्यांना सहा. कुलसचिव या पदावर कायम करण्यासही मान्यता देण्यात आली.* |



★ कुलसचिव ★

17

| | | |
|---|---|---|
| | 173.3.3 | **Audio Video Centre – New Statutes मान्यतेसाठी सादर....**<br><br>या संदर्भात मसुदा परिनियम 03 of 1994 नुसार व्यावसायिक व तांत्रिक पदांचे परिनियम तयार करून त्यास दिनांक 6 एप्रिल 1998 नुसार मा.कुलपती कार्यालयाने मान्यता दिलेली आहे. यात तांत्रिक व व्यावसायिक पदांना अध्यादेशाद्वारे Career Advancement योजनेन्वये वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी लागू करण्याचे निर्देशित केले आहे. परंतु या पदांना अद्यापपावेतो अशी योजना कार्यान्वित केलेली नव्हती. उपरोक्त मसुदा परिनियमानुसार दृकश्राव्य केंद्रातील तांत्रिक व व्यावसायिक पदांची नियुक्ती, त्यासाठी शैक्षणिक पात्रता, पदांचे कर्तव्य, जबाबदाऱ्या, पदोन्नतीचे नियम व धोरणे ठरविणे, सेवेच्या शर्ती ठरवणे, यासाठी मा. कुलगुरूंच्या मान्यतेने दिनांक 14-5-2018 रोजी प्रा. अंबादास मोहिते, वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार, अमरावती विभागीय केंद्र यांचे अध्यक्षतेखाली मसुदा समिती नियुक्त करण्यात आली होती. सदर समितीने सादर केलेला अहवाल दिनांक 18 ऑक्टोबर 2019 च्या व्यवस्थापन मंडळात सादर केला असता व्यवस्थापन मंडळ ठराव क्र. 170.3.9 अन्वये विधि सदस्य असलेल्या समितीकडून तपासून घेऊन पुढील बैठकीत सादर करावा असा ठराव मंजूर करण्यात आला होता. त्यानुसार डॉ. वडनेरे यांचे अध्यक्षतेखाली ॲड. सुनिता लाड, कायदेशीर सल्लागार व श्री. सुनिल विभांडिक, सहा. कुलसचिव यांची समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने आपला अहवाल दिनांक 30.11.2019 रोजी सादर केलेला आहे, अशी संपूर्ण पार्श्वभूमी मा. कुलसचिव यांनी सादर केली.<br><br>या विषयाबाबत चर्चा करतांना डॉ. दिलीप म्हैसेकर यांनी पुढे पदे निर्माण झाल्यानंतर ती भरण्यासाठी Statutes ची आवश्यकता आहे असे सांगितले.<br><br>*व्यवस्थापन मंडळ ठराव- याबाबत सविस्तर चर्चा होऊन Audio Video Centre मधील तांत्रिक व व्यावसायिक पदांचे मसुदा परिनियम मा.कुलपती कार्यालयाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात आली.* |
| | 173.3.4 | **नोव्हेंबर 2005 नंतर नियमित वेतन श्रेणीत नियुक्ती केलेल्या शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांना NPS योजना लागू करण्याची बाब...**<br><br>या विषयाबाबत बैठकीच्या सुरुवातीलाच माहिती देण्यात आलेली असून HDFC कंपनीने त्यांचे Presentation सादर केलेले आहे. व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयानुसार हा विषय वित्त समितीच्या पुढील बैठकीत सादर करण्यात येईल.<br><br>*व्यवस्थापन मंडळ ठराव- वित्त समितीच्या शिफारसीनंतर व्यवस्थापन मंडळाच्या पुढील बैठकीत हा विषय ठेवावा असे सर्वानुमते मान्य करण्यात आले.* |



कुलसचिव ... मुक्त विद्यापीठ, नाशिक-४२२ २२२

| | | |
|---|---|---|
| | 173.3.5 | **विद्यापीठामध्ये निवृत्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी यांच्या सेवा करार पद्धतीने हंगामी स्वरुपात घेण्याबाबत...**<br><br>मा. कुलगुरू यांनी सध्या कार्यरत असलेल्या प्राध्यापक व अधिकाऱ्यांच्या संख्येविषयी माहिती दिली. निवृत्ती नंतर रिक्त होत असलेल्या जागा शासनाच्या निर्बंधामुळे भरता येत नसल्याने कामकाजात अडचणी निर्माण होतात. तसेच UGC च्या नियमानुसार आवश्यक मनुष्यबळ असणेही क्रमप्राप्त आहे. त्यामुळे निवृत्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी यांच्या सेवा विद्यापीठ कामकाजाच्यादृष्टिने घेणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.<br><br>***व्यवस्थापन मंडळ ठराव****- सविस्तर चर्चेनंतर डॉ. सूर्या गुंजाळ, डॉ. प्रकाश अतकरे, यांना विद्यापीठ परिनियम 11 (2 of 1993) 5.4 मधील तरतूदीनुसार 1 वर्षासाठी व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली व निवृत्त प्राध्यापक व अ वर्ग अधिकारी नियुक्त करण्यास संमती देण्यात आली.* |
| | 173.3.6 | **दि. 31 मार्च 2020 व दि. 15 एप्रिल 2020 रोजी झालेल्या वित्त समितीचे इतिवृत्त मंजूरीस्तव सादर....**<br><br>1) सन 2019-20 चे सुधारित व सन 2020-21 चे अंदाजपत्रक व्यवस्थापन मंडळाच्या मंजुरीस्तव सादर.<br><br>सन 2019-20 चे सुधारित व सन 2020-21 चे अंदाजपत्रक श्री. मगन पाटील यांनी सादर करून जमा व खर्च संबंधीची सविस्तर माहिती Presentation द्वारे दिली. या विषयी चर्चा करतांना डॉ. आशिष पातूरकर यांनी एकूण खर्चाची दर्शविलेली रक्कम दुरुस्त करून घ्यावी असे निदर्शनास आणून दिले. तसेच विद्यापीठाचे सन 2020-21 चे अंदाजपत्रक हे Deficit असून त्याबाबत विचारणा केली. याबाबत कुलसचिव यांनी सविस्तर माहिती देऊन त्यांच्या शंकेचे निरसन केले. डॉ. अनिल कुलकर्णी यांनी मागिल वर्षाची व या वर्षाची Academic Fee आणि Exam Fee यामध्ये खूप तफावत असल्याचे निर्दशनास आणून दिले. याबाबत कुलसचिव यांनी यापूर्वी Academic Fee ही एकाच Head खाली घेण्यात येत होती व आता ती स्वतंत्र Head खाली दर्शविली असल्याबाबत माहिती देऊन त्यांच्या प्रश्नांचेही निरसन केले. एप्रिल 2020 ते सप्टेंबर 2020 या कालावधीत जमा झालेली रक्कम व खर्च यांचा ताळमेळ घेऊन कोरोनाच्या पार्श्वभमीवर काही खर्च होणार नसल्याने डिसेंबर महिन्यात सुधारित बजेट करतांना काही रकमांमध्ये सुधारणा करावी लागेल, असेही पुढे डॉ. अनिल कुलकर्णी यांनी सुचविले. अंदाजपत्रकावर चर्चा करतांना नागपूर व पुणे येथील जागांवर भविष्यातील सुरक्षेच्यादृष्टिने |



कुलसचिव ... मुक्त विद्यापीठ, नाशिक-४२२ २२२

| | | |
|---|---|---|
| | | विद्यापीठाने कंपाऊंडचे काम तातडीने हाती घ्यावे तसेच तेथे वृक्ष लागवड करणे आवश्यक असल्याचे सर्व सन्मा. सदस्यांनी प्रतिपादन केले. पुणे येथील जागेवर लवकरात लवकर बांधकाम सुरु करावे. पुण्यातील काही अभ्यास केंद्रांशी संपर्क साधून त्यांचेकडून कंपाउंड लगत वृक्ष लागवड करून घ्यावी, असेही डॉ. अनिल कुलकर्णी यांनी पुढे सुचविले.<br><br>***व्यवस्थापन मंडळ ठराव-*** *सविस्तर चर्चेनंतर विद्यापीठाच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.* |
| | 173.3.7 | **दि. 30.06.2020 रोजी झालेल्या परीक्षा मंडळाच्या बैठकीचे कार्यवृत्त मंजूरीस्तव सादर.**<br><br>1) One Student One Tree – Marks ही योजना सुरु करणे.<br><br>2) Pre-Final Years च्या परीक्षांचे निकाल घोषित करण्याचे धोरण ठरविणे.<br><br>(1) विद्यापीठाच्या One Student One Tree – YOSOT या योजनेबद्दल कुलसचिव, डॉ. दिनेश भोंडे यांनी सविस्तर माहिती दिली. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या गुणांची, विद्यार्थ्यांनी झाडे वाढविण्याबाबत घ्यावयाची निगा, योजनेचे स्वरुप, इ. बाबत सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांविषयी सविस्तर माहिती सांगितली. या योजनेसाठी विद्यापीठाने Develop केलेल्या App ची माहितीही कुलसचिवांनी यावेळी दिली. या संदर्भात विद्यापीठाने तयार केलेली दृकश्राव्य फित सर्व सन्मा. सदस्यांना दाखविण्यात आली.<br><br>पर्यावरणाच्या तसेच विद्यार्थ्यांमध्ये याबाबत जागृती निर्माण करण्याच्यादृष्टिने ही योजना अत्यंत महत्वपूर्ण असल्याचे डॉ. सचिन मांडवगणे यांनी प्रतिपादन केले व ही योजना हाती घेतल्याबद्दल विशेष कौतुक करून माझे क्षेत्र हेच असल्याने याबाबत तांत्रिक माहिती अथवा इतर कोणतेही सहकार्य हवे असल्यास संपर्क करणेबाबत सुचविले. तसेच या अत्यंत सुंदर योजनेची आवश्यक ती Publicity झाली पाहिजे असेही मत त्यांनी पुढे मांडले.<br><br>(2) विद्यापीठाच्या Pre-Final Years च्या परीक्षांचे निकाल घोषित करण्याबाबतची शासनाच्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती कुलसचिव यांनी दिली. यासाठी वापरावयाचे सूत्र, विद्यार्थ्यांना द्यावयाचे गुण याबाबतही त्यांनी सदस्यांना सविस्तर अवगत केले. तसेच UGC, महाराष्ट्र शासन यांचेकडून भविष्यात प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार कार्यवाही करावी लागेल असेही त्यांनी पुढे सांगितले.<br><br>***व्यवस्थापन मंडळ ठराव-*** *याबाबत परीक्षा मंडळाने केलेल्या ठरावानुसार दोनही विषयांना मंजूरी देण्यात दिली. तसेच भविष्यात UGC, महाराष्ट्र शासन यांचेकडून प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यासही मान्यता देण्यात आली.* |

| | | |
|---|---|---|
| | 173.3.8 | **विद्यापीठातील उपक्रमांबाबत माहिती (Information about University Activities)...**<br>(सदर विषय मा. कुलगुरू तथा अध्यक्ष यांचे निर्देशानुसार बैठकीच्या सुरुवातीला चर्चेसाठी घेण्यात आला होता.)<br>1) **ऑनलाईन संपर्क सत्रे (Online Lecturs)**<br>विद्यापीठाच्या महाराष्ट्रभरातील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासकेंद्रांनी Zoom किंवा इतर App च्या सहाय्याने Online Lectures घेणेबाबतची योजना आखली. या योजनेस महाराष्ट्रभरातील विद्यार्थ्यांकडून खूप चांगला प्रतिसाद मिळाला. या संदर्भात विद्यापीठाने निर्माण केलेली दृकश्राव्य फित सर्व सदस्यांना दाखविण्यात येऊन अधिक माहिती देण्यात आली. दिनांक 14 एप्रिल ते 12 जून 2020 या साधारण दोन महिन्यांच्या कालावधीत एकूण 8038 Online Lectures पार पडली. काही विद्यार्थ्यांनी घरून, कामाच्या ठिकाणाहून, ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांनी शेतातून, इतकेच नव्हे तर सैन्यातील एका विद्यार्थ्याने देशाच्या सीमेवरून या सत्रांमध्ये सहभाग नोंदविला. विद्यापीठाच्या अपेक्षेपेक्षाही हे खूप चांगले यश होते.<br>कोरोनामुळे निर्माण झालेल्या आपत्तीत **Convert this Crisis into Opportunity** असे मा. प्रंतप्रधानांनी आवाहन केल्याप्रमाणे विद्यापीठाने हे पाऊल उचललेले असून भविष्यातही तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करून विद्यापीठाकडून अशाप्रकारचे प्रकल्प राबविले जातील असे मा. कुलगुरू यांनी प्रतिपादन केले.<br>*अभ्यास केंद्रे, विभागीय केंद्रे व विद्यापीठासाठी ही निश्चितच कौतुकास्पद अशी कामगिरी आहे अशी भावना मा. सदस्यांनी व्यक्त केली.*<br>2) **Online MBA Entrance Examination**<br>कोरोना प्रादुर्भावाच्या परिस्थितीत एम.बी.ए. शिक्षणक्रमाची प्रवेश परीक्षा पारंपरिक पद्धतीने घेता येणे शक्य नसल्याने विद्यापीठाच्या आवश्यकतेनुसार MKCL च्या सहाय्याने विद्यार्थ्याला घरी बसून किंवा त्याच्या सोईच्या ठिकाणाहून व सोईच्या वेळी परीक्षा देता येईल असे Online Proctored Examination Software तयार करून घेतले. याबाबतचे Presentation सर्व सन्मा. सदस्यांना दाखविण्यात आल्यानंतर डॉ. अनिल कुलकर्णी व डॉ. मांडवगणे यांनी या संदर्भात विचारलेल्या शंकांचे कुलसचिवांनी निरसन केले व याबाबत अधिक माहिती दिली.<br>या परीक्षेस साधारण 1000 विद्यार्थी प्रवेश परीक्षा देतील असा विद्यापीठाचा अंदाज होता. मात्र या ऑनलाईन प्रवेश परीक्षेस मिळत असलेला प्रतिसाद |



★ कुलसचिव ★ ...मुक्त विद्यापीठ, नाशिक...

| | | |
|---|---|---|
| | | पहाता, ही संख्या 3,000 पर्यंत जाईल अशी अपेक्षा आहे. त्यामुळे या वर्षी MBA प्रवेश संख्या ही मागील वर्षापेक्षा अधिक होईल अशी खात्री आहे.<br>*ऑनलाईन प्रवेश परीक्षा अत्यंत उत्कृष्ठपणे पार पडत असल्याबद्दल सर्व सदस्यांनी समाधान व्यक्त केले.*<br>3) **Green Technology and Sustainable Development**<br>बांबूचा उपयोग अत्यंत मर्यादित स्वरुपात व गरीबांकडूनच होतो. बांबू फक्त जंगल परिसरात रहाणाऱ्या गरीबांच्या निवाऱ्यासाठीच उपयोगी असल्याचा गैरसमज आहे. मात्र बांबू ही बहुपयोगी वनस्पती आहे. बांबूची Tensile आणि Compressive Strength चांगली आहे. बांबूची Strength लोखंडाच्या तुलनेत निम्मी असून भुकंपा सारख्या परिस्थितीतही बांबूची इमारत अंगावर पडत नाही. त्यामुळे बांबूचा उपयोग बांधकामात मोठ्या प्रमाणात व्हावा तसेच शेतकऱ्यांनाही त्याचा उपयोग व्हावा यासाठी विद्यापीठाने बांबू डोमचा उपक्रम हाती घेतला असल्याची माहिती कुलसचिवांनी दिली. या उपक्रमाबाबतची अधिक माहिती Presentation द्वारे विद्यापीठाने तयार केलेल्या दृकश्राव्य फितीद्वारे सादर करण्यात आली. यासाठी 30 x 25 फूट आकारमानाचा बांबूचा डोम विद्यापीठ प्रक्षेत्रात तयार केला. एकूण 8 टन वजनासाठी याचे डिझाईन केलेले असून 16 कॉलम्सवर भारमान (load) transfer केलेला आहे. याचे Foundation, Columns, भिंती, Flooring सर्व बांबूचे आहेत. नाशिक मध्ये नुकत्याच येऊन गेलेल्या चक्रीवादळातही या डोमला काही झाले नाही. डॉ. पातूरकर यांनी याची क्षमता, गुणधर्म, उपयोग, इ. विषयी माहिती विचारली असता कुलसचिवांनी याबाबत अधिक माहिती दिली. यासाठी बांबू विद्यापीठाचाच वापरण्यात आलेला आहे. शेतावरील शेत कामगारांना प्रशिक्षण देऊन त्यांचेकडून हे काम करून घेण्यात आलेले असून ते कामगारच आता प्रशिक्षित झालेले आहे. या सर्वांमुळे खर्चात मोठी बचत झालेली आहे. या बांबूच्या इमारतीस **कृषी प्रशिक्षण सभागृह** असे नाव देण्यात येणार असून येथे शेतकऱ्यांचे प्रशिक्षण आयोजित केले जातील.<br>विद्यापीठाने केलेली वरील कामगिरी पहाता Green Technology and Sustainable Development यावर एखादा शिक्षणक्रम विद्यापीठाने विकसित करावा अशी सूचना डॉ. मांडवगणे यांनी केली तर डॉ. पातूरकर यांनी त्यांचे विद्यापीठ परिसरात उपहार गृहासाठी बांबुची इमारत तयार करु असे सांगितले.<br>*विद्यापीठाने खूप सुंदर प्रकल्प राबविल्याबद्दल व बांबू संदर्भात जनगागृती* |



कुलसचिव ★ ४२२ २२२ ... मुक्त विद्यापीठ, नाशिक

*निर्माण करीत असलेल्या प्रयत्नांबद्दल मा. कुलगुरू, कुलसचिव व सर्व संबंधितांचे व्यवस्थापन मंडळ सदस्यांनी विशेष अभिनंदन केले.*

4) **सन 2013 पासून प्रलंबित सेवानिवृत्ती प्रकरणांबाबत....**

सन 2013 पासून विद्यापीठातील अनेक अधिकारी कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीची प्रकरणे प्रलंबित होती. सुरुवातीला 103 शिक्षक, अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या सेवांबाबतची असलेली संख्या 70 वर आणली. व्यवस्थापन मंडळाने नेमलेल्या व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. कुलकर्णी समितीने या प्रकरणातील वयोधिक्य, इ. बाबतच्या त्रुट्यांबाबत अभिप्राय दिले. त्यानंतर ही प्रकरणे व्यवस्थापन मंडळात मंजूर करण्यात आली असून ही प्रकरणे AG Office, मुंबई येथे सादर झालेली आहेत. यापैकी काहींना निवृत्ती वेतन लागू झालेले असून काहींना ते लवकरच लागू होईल. यासाठी डॉ. अनिल कुलकर्णी यांनी खूप परिश्रम घेतले असून त्यांनी अनेकदा विद्यापीठात भेट देऊन बैठका घेतल्या व हे काम मार्गी लावले असल्याची माहिती मा.कुलगुरू यांनी दिली. डॉ. अनिल कुलकर्णी, कुलसचिव व आस्थापना कक्षातील अधिकारी व कर्मचारी, तसेच सह संचालक, उच्च शिक्षण, पुणे या कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी श्रीमती अर्चना बोराडे यांच्या सहकार्यामुळेच गेली सात वर्षे प्रलंबित असलेली ही प्रकरणे मार्गी लागू शकली असेही मा. कुलगुरू यांनी पुढे नमूद केले.

*याबाबत डॉ. कुलकर्णी व उपरोक्त अधिकाऱ्यांचे अभिनंदन करावे असे डॉ. म्हैसेकर यांनी सुचविले तर सह संचालक, उच्च शिक्षण कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी श्रीमती अर्चना बोराडे यांना आभाराचे पत्र पाठवावे असे डॉ. अनिल कुलकर्णी यांनी सांगितले.*

5) **सन 2014 पासून प्रलंबित असलेल्या भविष्य निर्वाह निधी ताळमेळ प्रकरणांबाबत...**

सन 2014 मध्ये सह संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे कार्यालयात 6.50 लक्ष रुपयांचा धनादेश गहाळ झाल्यामुळे भविष्य निर्वाह निधीचे प्रकरण प्रलंबित होते, पावत्याही प्राप्त होत नव्हत्या. या संदर्भात डॉ. पातूरकर यांनी हे खाते Online का दिसत नाही याबाबत विचारणा केली असता, विद्यापीठातील सेवकांच्या भविष्य निर्वाह निधीची रक्कम ही DD द्वारे सह संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे कार्यालयाकडे जमा करण्यात येते व त्या कार्यालयाकडून ती भविष्य निर्वाह निधीत जमा करण्यात येत असल्याची माहिती कुलसचिवांनी दिली. त्यामुळे विद्यापीठ सेवकांचे भविष्य निर्वाह निधीचे खाते Online पहाता येत नाही. आता हा प्रश्न सुटलेला असून सन 2018-19 पर्यंतच्या पावत्या तयार झालेल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| | | 6) **शिक्षकांना सातवा वेतन आयोग लागू करणेबाबत....** <br> विद्यापीठातील शिक्षकांना सातवा वेतन आयोग लागू करणेबाबतचा ठराव व्यवस्थापन मंडळाच्या मागील बैठकीत मंजूर करण्यात आला होता. शिक्षकांच्या Service Book वर 2006 च्या सहाव्या वेतन आयोगानुसार entries व Stamping ही झालेले नव्हते. सर्व शिक्षकांचे 2006 मधील सहावा वेतन आयोग आणि 2016 च्या सातव्या वेतन आयोगानुसार Fixation करून सह संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे कार्यालयाकडून तसे Certification आल्यानंतर शिक्षकांचे एप्रिल 2019 पासून सातव्या वेतन आयोगानुसार वेतन करण्यात आलेले आहे. प्रशासकीय कर्मचाऱ्यांचा शासन आदेश आल्यानंतर तो लागू करण्यात येईल, अशी माहिती कुलसचिवांनी दिली. <br> 7) **2019-20 विद्यार्थी संख्या वाढीबाबत....** <br> शैक्षणिक वर्ष सन 2018-19 वर्षात विद्यापीठाच्या विद्यार्थी संख्या 6.27 लक्ष होती. गेल्या वर्षी UGC ने 11 शिक्षणक्रमांना मान्यता न दिल्याने या शिक्षणक्रमांचे प्रवेश होऊ शकले नव्हते. संशोधनाअंती असेही लक्षात आले की जवळपास 1.75 लक्ष विद्यार्थी पुढील वर्षात प्रवेश घेत नसल्याने गळतात (Drop out). त्यामुळे 2019-20 शैक्षणिक वर्षात 5 लक्षापेक्षाही कमी प्रवेश होणार होते. ही गळती रोखण्यासाठी व अधिकाधिक प्रवेश होण्यासाठी विद्यापीठाच्या नोंदणी व जनसंपर्क कक्षाकडून अनेक उपाययोजना व नवनवीन उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमांबाबतची माहिती Presentation द्वारे सादर करण्यात आली. लाखो संभाव्य गळीत विद्यार्थ्यांना वैयक्तिक SMS करून त्यांचे समुपदेशन करण्यात आले. त्यामुळे मागिल वर्षी 5.15 लक्षापर्यंत अपेक्षित असलेली विद्यार्थी संख्या वाढून 6.32 लक्ष होण्यास मदत झाली. या पुर्वीच्या वर्षात ही संख्या 6.27 लक्ष इतकी होती. <br> *विद्यापीठाने केलेल्या विविध प्रयत्नांमुळे विद्यार्थी संख्या कायम ठेवण्यास यश आले त्याबद्दल डॉ. अनिल कुलकर्णींसह सर्व सदस्यांनी अभिनंदन केले.* |
| 173.4.0 | | **कार्योत्तर मान्यतेचे विषय** |
| | 173.4.1 | BRAOU, Hyderabad **या विद्यापीठाशी** M.Sc. (Physics), M.Sc. (Chemistry), M.Sc. (Botany), M.Sc. (Zoology) **ह्या शिक्षणक्रमाची** Study Material **घेण्याबाबत झालेल्या कराराची प्रत मान्यतेसाठी सादर.** <br> ***व्यवस्थापन मंडळ ठराव-*** *BRAOU, Hyderabad या विद्यापीठाशी M.Sc. (Physics), M.Sc. (Chemistry), M.Sc. (Botany), M.Sc. (Zoology) या शिक्षणक्रमाची Study Material घेण्याबाबत झालेल्या करारास* |



कुलसचिव

| | | |
|---|---|---|
| | | *मा.कुलगुरूंनी दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली व त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.* |
| | 173.4.2 | **जानेवारी 2020 मध्ये मुलाखती घेऊन करारावर नियुक्त केलेल्या शैक्षणिक संयोजकांची यादी मान्यतेसाठी सादर.**<br><br>***व्यवस्थापन मंडळ ठराव-*** *जानेवारी 2020 मध्ये मुलाखती घेऊन करारावर नियुक्त केलेल्या शैक्षणिक संयोजकांच्या नियुक्तीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.* |
| 173.5.0 | | **मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळचे विषय** |
| | 173.5.1 | **विद्यापीठ प्रक्षेत्रातील कृषी विज्ञान केंद्राच्या तांत्रिक अधिकारी कर्मचाऱ्यांना CAS योजना लागू करणेबाबत....**<br><br>विद्यापीठ प्रक्षेत्रातील कृषी विज्ञान केंद्रातील अधिकारी कर्मचाऱ्यांचे वेतन ICAR कडून प्राप्त होणाऱ्या अनुदानातून देण्यात येत असल्याचे व त्यांना ICAR चे Service Ruels लागू असल्याने या केंद्रातील तांत्रिक अधिकारी कर्मचाऱ्यांना CAS अंतर्गत पदोन्नती देण्याबाबतच्या केलेल्या संपूर्ण कार्यवाहीचा तपशिल कुलसचिव यांनी दिला. यासंदर्भात उच्च शिक्षण संचालक, पुणे यांचेकडून मंजूरीचे पत्र क्र. युएनआय/2019/कॅस/AICTE/ यचममुवि/विशि-1/5063 दिनांक 30 जुलै 2020 पत्र प्राप्त झालेले असून ते सोबत जोडलेले आहे. (सोबत सहपत्र)<br><br>***व्यवस्थापन मंडळ ठराव-*** *विद्यापीठातील कृषी विज्ञान केंद्रातील तांत्रिक अधिकारी कर्मचारी यांना CAS योजनेअंतर्गत पदोन्नती देण्यास मान्यता आली.* |
| | 173.5.2 | **विद्यापीठात Architecture शिक्षणक्रम सुरु करणेबाबत....**<br><br>विद्यापीठात यापूर्वी Diploma, Degree व Master Degree असे Architecture शिक्षणक्रम राबविण्यात येत होते. यास Architecture Council ची मान्यता होती. मात्र AICTE ने Engineering व Architecture शिक्षणक्रम मुक्त विद्यापीठातून राबविण्यास बंदी आणल्याबाबतची माहिती कुलसचिव, डॉ. दिनेश भोंडे यांनी दिली. Architecture Council ने Architecture संबंधी शिक्षणक्रम विद्यापीठात राबविण्यास परवानगी दिल्यास हे शिक्षणक्रम सुरु करता येतील, असेही पुढे त्यांनी सांगितले.<br><br>या संदर्भात डॉ. म्हैसेकर, मुक्त विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू असतांना त्यांनी नवी दिल्ली येथे मा. श्री. प्रकाश जावडेकर साहेब तसेच मा. श्री. नितीन गडकरी साहेब यांचेसमवेत यासाठी बैठका घेतल्याचे निदर्शनास आणून दिले. Architecture मधील Diploma शिक्षणक्रम विद्यापीठाने राबविल्यास तो |

| | | |
|---|---|---|
| | | अत्यंत उपयुक्त राहील असे या क्षेत्रातील तज्ज्ञांबरोबर झालेल्या बैठकांमध्ये विषद करण्यात आलेले आहे.<br>***व्यवस्थापन मंडळ ठराव****- या संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात येऊन Architecture मधील Diploma शिक्षणक्रमाचे महत्व लक्षात घेता हे शिक्षणक्रम मुक्त विद्यापीठामार्फत राबविण्यात यावे. यासाठी संचालक, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांनी सविस्तर प्रस्ताव तयार करावा व विद्यापीठाने तो मान्यतेसाठी संबंधित प्राधिकरणाकडे पाठवावा असा ठराव मंजूर करण्यात आला.* |
| | 173.5.3 | **वित्त समितीवर सदस्यांचे नाम निर्देशन करणेबाबत.....**<br>***व्यवस्थापन मंडळ ठराव****- या विषयावर चर्चा होऊन वित्त समितीवर व्यवस्थापन मंडळातून डॉ. अनिल कुलकर्णी व डॉ. सचिन मांडवगणे यांचे नाम निर्देशन करण्यात आले. तसेच व्यवस्थापन मंडळाने उद्योग, स्वायत्त संस्था, विद्यापीठ किंवा शासन येथील दोन सदस्य नाम निर्देशित करणेबाबत मा.कुलगुरूंना अधिकार देण्यात आले.*<br>*त्यानुसार मा.कुलगुरू यांनी डॉ. संजय खडक्कार यांची पुर्ननियुक्तीने तर श्री. ज्ञानदेव नाठे यांची नावे सुचविली, त्यास मान्यता देण्यात आली.* |
| | | शेवटी मा. कुलगुरू यांनी प्रदिर्घ कालावधीपासून प्रलंबित असलेल्या करारावरील 17 कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाविषयी सुरुवातीपासूनची माहिती दिली. या संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाने ने निर्देशित केल्यानुसार मा.कुलगुरू यांनी एक त्रिसदस्यीय समिती नेमली असल्याची माहितीही त्यांनी पुढे दिली. या समितीत महाराष्ट्र शासनाच्या Legal Department चे निवृत्त सचिव श्री. हमीद पटेल, मुंबई येथील डॉ.पंजवाणी व व्यवस्थापन मंडळातून डॉ. अनिल कुलकर्णी यांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले.<br>*मा. कुलगुरू यांनी नेमलेल्या या त्रिसदस्यीय समितीस सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.* |
| | | सभेच्या शेवटी डॉ. आशिष पातूरकर यांनी एका अभ्यास केंद्रांची मान्यता रद्द करणेविषयी पत्र प्राप्त झाल्याचे सांगितले. यावर डॉ. सचिन मांडवगणे यांनी विद्यापीठात Academic Calendar आवश्यक असून ते नियमितपणे Follow |

| | | |
|---|---|---|
| | | करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. अभ्यास केंद्रांना मान्यता देण्याची प्रक्रिया व धोरण हे Faculty-wise किंवा School-wise नसावे तर ते Uniform असावे असे प्रतिपादन केले. तसेच विद्यार्थ्यांसाठी Students Grievance Redressal System व Help Line असणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी पुढे सांगितले. आवश्यकता भासल्यास हे केंद्र Out Sourcing द्वारे चालविण्यात यावे असेही पुढे त्यांनी सुचविले.<br>*यावर अभ्यास केंद्रांना मान्यता देण्याबाबत धोरण व प्रक्रिया ठरविण्यासाठी डॉ. अनिल कुलकर्णी व डॉ. सचिन मांडवगणे यांची समिती नेमण्यात यावी असे ठरले.* |

सभेच्या शेवटी सर्व सदस्यांचे आभार मानून मा.कुलगुरू तथा अध्यक्ष यांचे परवानगीने सभा संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

सचिव
व्यवस्थापन मंडळ

अध्यक्ष
व्यवस्थापन मंडळ